दै. लोकमत 1-1-03

1-1-03

# छ. शिवरायांना प्रजेची अपार कणव : पानसरे

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराजांना प्रजेची अपार कणव होती, असे प्रतिपादन कॉ. गोविंद पानसरे यांनी केले. कमला महाविद्यालयात आयोजित केलेल्या 'शिवकार्याचे सत्य स्वरूप' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील होते. गोविंद पानसरे म्हणाले, इतिहासामध्ये राजे अनेक होऊन गेले, पण त्या सर्वांमध्ये जनतेवर प्रभाव असणारा राजा म्हणजे छत्रपती शिवाजी होय. शिवाजी महाराजांनी स्वतः राज्य निर्माण केले. हे राज्य प्रजेच्या कल्याणाचे होते. त्यांची श्रद्धा हिंदू धर्मावर होती, पण मुस्लिम धर्माचा त्यांनी कधीही द्वेष केला नाही. जनतेची काळजी घेणाऱ्या या राजाची खरी प्रतिमा जनतेसमोर यावी, असेही पानसरे यावेळी म्हणाले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. सौ. व्ही. व्ही. मेन्दगी यांनी केले. आभार प्रा. सौ. तेजस्विनी मुडेकर यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सौ. बी. व्ही. शेळके यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. तरुणभारत - 1-1-03

दि 1-1-03 तरुणभारत

# छ. शिवरायांची खरी प्रतिमा समाजासमोर आली पाहिजे



ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात बोलताना ॲड. गोविंद पानसरे. सोबत प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील.

**कोल्हापूर ■**

छत्रपती शिवाजी महाराजांची खरी प्रतिमा समाजासमोर आली पाहिजे, असे मत ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉ. गोविंद पानसरे यांनी व्यक्त केले. ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयातील समाजशास्त्र अभ्यास मंडळ आणि प्राध्यापक प्रबोधीनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात 'शिवकार्याचे सन्य स्वरुप' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील होते.

ॲड. पानसरे पुढे म्हणाले, शिवाजी महाराजांची इतिहासातील प्रतिमा इतिहासाशी इमान राखणारी नाही. इतिहासात अनेक राजे होऊन गेले पण जनतेवर प्रभाव असणारे शिवाजी महाराज एकमेव राजे होते. शिवाजी

## कॉ. गोविंद पानसरे यांचे मत

महाराजांनी स्वत: स्वराज्य निर्माण केले त्याचे राज्य प्रजेच्या कल्याणाचे राज्य होते. म्हणूनच छत्रपतीसाठी माणसे मरण पत्करण्यास तयार होती, असे सांगून छत्रपती शिवाजी महाराजांना प्रजेची कणव होती, असे सांगितले.

शिवाजी महाराजांची हिंदू धर्मावर श्रद्धा होती. परंतु त्यांनी मुस्लिम धर्माचा द्वेष केला नाही, असे सांगून शिवाजी महाजारांचे सहकारी व रयत त्यांच्या कार्यात सर्वस्वाचा त्याग करीत सहभागी होती हे निर्विवाद सत्य असल्याचे सांगितले. ॲड. पानसरे पुढे म्हणाले, शिवाजी महाराजांची धर्मश्रद्धा आंधळी नव्हती, रयतेच्या संपतीची, अब्रुची आणि शेतकऱ्यांच्या कष्टाची काळजी घेणारा हा राजा होता. इतिहासातील त्यांची हीच खरी प्रतिमा समाजासमोर आली पाहिजे.

प्रा. डॉ. सौ. व्ही.व्ही.मैंदर्गी यांनी प्रास्ताविक करुन पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सौ.बी.व्ही.शेळके यांनी केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका

## कमला कॉलेजचे स्नेहसंमेलन

**कोल्हापूर, ता. १८ :** येथील ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन झाले. उद्घाटन प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते झाले. नम्रता तांबट यांनी कथक नृत्य केले.